सन २०२५-२६ " मोबाईल मेडिकल युनिट " जाहिरात नमुना

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर येथून, करमाळा तालुकाकरीता **" मोबाईल मेडिकल युनिट" (फिरता दवाखाना)** राबविण्यात येत असल्याने, सदरील मोबाईल मेडिकल युनिट मार्फत करमाळा तालुक्यातील दुर्गम व अतिदुर्गम असलेल्या गावपातळीवरील ग्रामस्थांना आरोग्य विषयक सेवा व सुविधा पुरविणेकामी आवश्यक असलेल्या ०४ संवर्गातील रिक्त असलेल्या ०४ पदांची पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत असुन, सदरील पदे ही **रोजंदारी स्वरुपाची आणि करार तत्वावरील व एकत्रित मानधनावरील** असुन, खालील तक्तानुसार पात्र ठरत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदांचा कार्यक्रम | पदांचे नाव | रिक्त पद संख्या | पदांची शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | पदांचे मानधन | सामाजिक आरक्षण | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोबाईल मेडिकल युनिट | महिला वैदयकिय अधिकारी | 01 | MBBS with Valid Maharashtra Medical Coucil Registration | ७० वर्षापर्यन्त | रु. 60,000/- | कोणत्याही प्रवर्गातील उमेदवार | मोबाईल मेडिकल युनिट (फिरता दवाखाना) ता. करमाळा. |
| | | | | BAMS with Valid Maharashtra Coucil of Indian Medicine Coucil | 38 Years for General Category and 43 Years for Reserve Category | रु. 40,000/- | | |
| २ | | आरोग्य अधिपरीचारीका | 01 | GNM/B.Sc Nursing With Valid Maharashtra Nursing Coucil Registration | | रु. 18,000/- | कोणत्याही प्रवर्गातील उमेदवार | |
| ३ | | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 01 | 12th + DMLT Course With Valid Paramedical Coucil Registration | | रु. 18,000/- | कोणत्याही प्रवर्गातील उमेदवार | |
| ४ | | औषध निर्माता | 01 | D.Pharm / B.Phart with Valid Maharashtra State Pharmacy Coucil Registration | | रु. 18,000/- | कोणत्याही प्रवर्गातील उमेदवार | |
| | | **Total Post** | **04** | | | | | |

टिप :- १) पद क्र. ०१ करीता प्रथम प्राध्यान्याने MBBS शैक्षणिक अर्हतेचा उमेदवार निवडण्यात येईल.
२) पद क्र. ०१ करीता MBBS शैक्षणिक अर्हतेचा उमेदवार अप्राप्त राहिल्यास, BAMS शैक्षणिक अर्हतेचा उमेदवार ग्राहय धरण्यात येऊन, त्याकरीता असलेले रु.४०,०००/- मानधनावर नियुक्ती देण्यात येईल.
३) उमेदवारांचे वय, ६० पेक्षा जास्त असल्यास, जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडील शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. तसेच सदरील प्रमाणपत्र हे प्रत्येक पुर्ननियुक्ती वेळेस सादर करणे बंधनकारक राहिल.

### अटी व शर्ती :-

१) वरील सर्व पदे ही **रोजंदारी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची** असुन, त्यांचा कालावधी हा दि.३१/०३/२०२७ पर्यन्तचा राहील. तसेच आधी सदरील पद भविष्यात सन २०२६-२७ मध्ये नामंजूर / रद्द झाल्यास किंवा सदरील पदांना मंजूरी अप्राप्त राहिल्यास वरील सर्व पदांची सेवा दिनांक ३१/०३/२०२७ रोजी आपोआप संपुष्टात येईल. परंतू वरील पदे सन २०२७-२८ करीता मंजूर झाल्यास पुढील ११ महिण्याकरीता पुनर्नियुक्ती समाधानकारक कार्यकालानंतर देण्यात येईल.

२) उमेदवारांकडून **दिनांक ३० / ०३ / २०२६ ते दिनांक ०९ / ०४ /२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११.०० ते दुपारी ०४.०० या वेळेतच अर्ज स्विकृती करण्यात येईल. अर्ज स्विकृती ही जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर** या ठिकाणी करण्यात येईल. **उमेदवारांस एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज सादर करायचा असल्यास, प्रत्येक पदाकरीता स्वंतत्रपणे अर्ज सादर करावा. परंतू वेळप्रसंगी एकाच वेळी मुलाखत/परिक्षा घेतली गेल्यास कोणत्या तरी एका पदाकरीता उपस्थित रहावे लागेल. ज्यास उपस्थित राहील त्या पदाकरीता संबधित उमेदवार ग्राहय धरुन, दुसऱ्या पदाकरीता गैरहजर ग्राहय धरण्यात येईल.**

